# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

**ई-मेलद्वारे**

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/तीन/प्र.क्र.६(A)(१५-१६)/ 1209
नागपूर ४४०००१, दिनांक 07/01/2026

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), सर्व
वनसंरक्षक (प्रा.), सर्व

**विषय :** वनरक्षक संवर्गातील कर्मचा-यांचे आंतरवृत्तीय बदलीबाबत

**संदर्भ :**
१) महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.एफएसटी-०३/१५/प्र.क्र.१५६ /फ-४, दिनांक ६/८/२०१५
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआव्ही-२०१६/प्र.क्र. ५०९/कार्या.१२, दिनांक १५/५/२०१९
३) महसूल व वनविभाग अधिसूचना क्र.एफएसटी-०५/१९/प्र.क्र.१२६ /वने-४, दिनांक १४/१०/२०२५

महसूल व वनविभाग, शासन निर्णय दिनांक ६/८/२०१५ (संदर्भ १) अन्वये वनविभागातील वनरक्षक (गट-क) या संवर्गातील कर्मचा-यांच्या आंतरवृत्तीय बदलीकरीता धोरण ठरवून दिलेले आहे. त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहे.

(इ) संबंधित वनरक्षकास कार्यरत वनवृत्तात किमान २ वर्ष सेवा होणे बंधनकारक राहील.

(ई) आंतरवृत्तीय बदलीकरीता कारणे :- ६ गंभीर आजार (हृदयशस्त्रक्रियांची प्रकरणे, मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया किंवा किडनी डायलेसिस, कर्करोग, ब्रेनट्युमर किंवा मेंदूवरील शस्त्रक्रिया, निश्चेतनावस्था (कोमा), मनोविकृतीने ग्रस्त). तसेच पती-पत्नी एकत्रीकरणातंर्गत.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५/५/२०१९ (संदर्भ २) अन्वये शासकीय कर्मचा-यांच्या विनंतीनुसार संवर्गातंर्गत एका नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवरुन दुस-या नियुक्ती प्राधिका-याच्या आस्थापनेवर राज्य शासकीय सेवेतील **"गट-क"** मधील कर्मचा-यांना कायमस्वरूपी समावेशन करण्याबाबतचे धोरण निश्चित केले आहे. त्यामधील प्रमुख अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

(१) संबंधित संवर्गात ५ वर्ष सलग सेवा झाली असावी.

(२) कर्मचारी ज्या संवर्गात कार्यरत आहे त्या संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या सर्व अर्हता (उदा. विविध परीक्षा इ.) पूर्तता करणे आवश्यक राहील.

(३) कर्मचा-यास स्थायित्व लाभ प्रमाणपत्र मिळालेले असणे आवश्यक आहे.

(४) मुळ संवर्गात त्यांची कामगिरी किमान ब दर्जाची असली पाहिजे.

(५) संबंधित कर्मचा-यांवर कोणतीही विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरणे चालू / प्रस्तावित नसावे.

वरील अटी व शर्तीशिवाय ज्या कारणास्तव बदली करावयाची आहे त्यामध्ये कर्मचारी दिव्यांग असणे, असक्षम मुलाचे पालक असणे, गंभीर आजार (एकूण ७), विधवा / विधुर कर्मचारी, पती-पत्नी एकत्रिकरण यांचा समावेश आहे.

३. वरील शासन, महसूल व वनविभाग निर्णय दिनांक ६/८/२०१५ (वनरक्षकासाठी) व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५/५/२०१९ (सर्व गट-क मधील कर्मचा-यांसाठी) यामध्ये किमान सेवा, बदलीचे कारण यामध्ये तफावत आहे.

४. वनरक्षक हे गट-क चे पद आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५/५/२०१९ (संदर्भ २) हा सर्व गट-क मधील कर्म-यांकरीता लागू आहे. परंतू शासन, महसूल व वनविभाग निर्णय दिनांक ६/८/२०१५ (संदर्भ १) अन्वये वनरक्षकांसाठी विशिष्ट धोरण लागू असल्याने आतापर्यंत वनरक्षकांच्या आंतरवृत्तीय बदल्या सदर शासन निर्णयान्वये करण्यात आल्या आहेत.

५. आता महसूल व वनविभाग, अधिसूचना दिनांक १४/१०/२०२५ (संदर्भ ३) अन्वये वनपाल व वनरक्षक सवंर्गाचे सेवाप्रवेश नियम विनिर्दिष्ट/निर्गमित करण्यात आले आहे. उपरोक्त सेवाप्रवेश अधिसूचनेतील नियम क्र.१५ मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

> *"१५. नियम ३ (वनपाल) व ४ (वनरक्षक) येथील पदावर नियुक्त झालेला उमेदवार वनवृत्तांतर्गत कोठेही बदलीसाठी पात्र राहील.*
>
> *परंतू असे की, नियम ३ व ४ येथील पदावर नियुक्त झालेल्या उमेदवाराची त्या* ***वनवृत्तात पाच वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेली असेल*** *तर, त्यांच्या विनंतीनुसार सेवाज्येष्ठता गमावण्याच्या अधीन राहून दुस-या वनवृत्तामध्ये बदली करता येईल, अशा कर्मचा-याची ज्या वनवृत्तामध्ये बदली करण्यात आली असेल, त्या वनवृत्तामध्ये त्याची सेवाज्येष्ठता त्या वनवृत्तामध्ये रुजू झाल्याच्या दिनांकास असलेल्या निम्नतम क्रमांकावर निश्चित करण्यात येईल."*

६. सद्यास्थितीत महसूल व वनविभाग, शासन निर्णय दिनांक ६/८/२०१५ मध्ये नमुद किमान सेवेची अट व सेवा प्रवेश नियमात नमुद किमान सेवेची अट यामध्ये विसंगती निर्माण झालेली आहे. परंतू सेवा प्रवेश नियम हे अनुच्छेद ३०९ मध्ये तयार करण्यात आले असल्याने ते लागू आहेत. गट-क मधील कर्मचा-यांची एका नियुक्ती प्राधिका-याकडून दुस-या नियुक्ती प्राधिका-याकडे बदलीसाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५/५/२०१९ (संदर्भ २) अन्वये धोरण ठरवून दिलेले आहे. वनरक्षक गट-क मधील कर्मचारी आहे. त्यामुळे यापुढे वनरक्षकांचे

आंतरवृत्तीय बदलीचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करताना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १५/५/२०१९ (संदर्भ २) अन्वये ठरवून दिलेल्या धोरणानुसार सादर करावेत.

**मुळ प्रत मा. प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) यांचेकडून अनुमोदीत**

(ऋषिकेश रंजन)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

**प्रतिलिपी** :- अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२